# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग
## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

दि.०८/०८/२०२२

## प्रेसनोट

### क्षयरोग निर्मूलनासाठी उद्योगसमूह, सामाजिक संस्था व दानशूर व्यक्ती इत्यादींनी मदत करण्याचे महानगरपालिकेमार्फत आवाहन

भारत सरकारने सन २०२५ पर्यंत देशाला क्षयरोग मुक्त करण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवले आहे. त्या अनुषंगाने शासन क्षयरुग्णांना वेगवेगळ्या पद्धतीने मदत देऊन त्यांना औषधोपचार मिळवून देत आहे. उपचार घेत असलेल्या क्षयरुग्णांना शासनामार्फत प्रत्येक महिन्याला निक्षय पोषण योजनेअंतर्गत ५०० रुपयांची मदत थेट बँक खात्यामध्ये दिली जात आहे. परंतु या व्यतिरिक्त क्षयरुग्णांना अतिरिक्त मदत देण्यासाठी केंद्र शासनामार्फत **प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियान** हा उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमांतर्गत क्षयरुग्णांना **अतिरिक्त पोषण आहार, डायग्नोस्टिक मदत, व्होकेशनल मदत** या स्वरूपातील मदत उद्योगसमूह, सामाजिक संस्था व दानशूर यांनी करावी असे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

ही मदत उपचार सुरु असणाऱ्या क्षयरुग्णांना किमान १ वर्षासाठी प्राधान्याने अतिरिक्त पोषण आहार तसेच डायग्नोस्टिक मदत, व्होकेशनल मदत या स्वरूपातील मदत उद्योगसमूह, सामाजिक संस्था व दानशूर व्यक्ती इत्यादींच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावयाची आहे. केंद्र शासनाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमास सहकार्य करण्यास इच्छुक असलेले उद्योगसमूह, सामाजिक संस्था व दानशूर व्यक्ती यांनी वसई विरार शहर महानगरपालिका **आरोग्य विभाग मुख्यालय** अथवा dtomhvvm@rntcp.org या ई-मेल आयडीद्वारे **'निक्षय मित्र'** म्हणून संपर्क साधावा आणि राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाला सहकार्य करून एकजुटीने हातभार लावावा असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम**
**वसई विरार शहर महानगरपालिका**